Leaflet_A5

सार्वजनिक आरोग्य विभाग
महाराष्ट्र शासन

सत्यमेव जयते

**आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय**
भारत सरकार

NHM
राष्ट्रीय आरोग्य अभियान
महाराष्ट्र

# एकजूटीने आपण मात करू शकतो गोवर आणि रुबेलावर

**गोवर आणि रुबेला**
**लसीकरण मोहीम**



## महत्त्वाचे संदेश

- ९ महिने ते १५ वर्ष वयोगटातील बालकांचे गोवर आणि रुबेला या रोगांपासून रक्षण व्हावे यासाठी गोवर-रुबेला (एमआर) लसीकरण मोहीम आयोजित करण्यात आलेली आहे.
- या मोहीमेत सक्रिय सहभाग घ्या आणि एमआर मोहीमेच्या लसीकरण सत्राची सोईस्कर वेळ आणि जागांचे नियोजन करण्यासाठी आरोग्य कर्मचाऱ्यांना मदत करा.
- पालक, कुटुंब आणि समुहांशी संवाद साधून समुदायामध्ये एमआर लसीचे आणि नियमित लसीकरणाचे फायदे अधोरेखित करा.
- घरोघरी दिल्या जाणाऱ्या भेटींदरम्यान आरोग्य कर्मचाऱ्यांसोबत जा, कुटुंबाची जमवाजमव करण्यासाठी तसेच अर्धवट लसीकरण केलेली/लसीकरणापासून वंचित राहिलेली कुटुंबे शोधून काढण्यासाठी मदत करा.
- स्थानिक शाळा आणि अन्य संस्थांच्या सहयोगाने एमआर लसीकरण मोहिमेचे प्रभावी नियोजन करण्यासाठी आरोग्य कर्मचाऱ्यांना मदत करा.
- लसीकरणानंतर विपरित घटना घडल्यास आरोग्य कर्मचाऱ्याच्या बरोबर निर्धारित करण्यात आलेल्या एईएफआय उपचार केंद्रामध्ये जा आणि गरज पडल्यास कुटुंबाला आवश्यक असलेली सर्व मदत करा.
- एमआर लसीकरण मोहीमेत निरुत्साह पसरवणाऱ्या अथवा त्यात व्यत्यय आणणाऱ्या घटनांचे प्रमाण कमीत कमी ठेवा.

unicef for every child

World Health Organization

सुजाण आणि कर्तव्यदक्ष व्हा!
आपल्या बालकाचे संपूर्ण लसीकरण करून घ्या !



## गोवर

- गोवर हा प्राणघातक रोग आहे आणि बालकांमधील शारीरिक अपंगत्व तसेच बालमृत्युच्या प्रमुख कारणांपैकी एक आहे.
- गोवर हा अतिशय संसर्गजन्य रोग आहे आणि त्याचा प्रसार संसर्ग झालेल्या व्यक्तीचे खोकणे आणि शिंकणे याद्वारे होतो.
- गोवरमुळे तुमच्या बालकाला न्युमोनिया, अतिसार आणि मेंदू संसर्ग यासारखे प्राणघातक आजार होण्याची शक्यता वाढते.
- तापासोबत त्वचेवर आलेले लालसर पुरळ, खोकला, नाकातून पाणी येणे आणि लाल झालेले डोळे ही गोवराची सामान्य लक्षणे आहेत.



## रुबेला

- गर्भवती महिलेला गर्भावस्थेच्या सुरुवातीच्या काळात रुबेलाचा संसर्ग झाला तर त्याचा परिणाम सीआरएसमध्ये (कॉनजेनिटल रुबेला सिंड्रोम) होऊ शकतो, ज्याचे परिणाम गर्भासाठी आणि नवजात शिशुसाठी गंभीर आणि प्राणघातक ठरू शकतात. गर्भावस्थेच्या सुरुवातीच्या काळात रुबेलाचा संसर्ग झालेल्या मातांनी जन्म दिलेल्या बालकांना दीर्घकालीन जन्मजात विकृती होण्याची शक्यता वाढते ज्याचे दुष्परिणाम डोळे (काचबिंदू, मोतीबिंदू), कान (बहिरेपणा), मेंदू (अतिशय लहान डोके असणारे बाळ, मतिमंदत्व) आणि हृदयातील दोष याप्रकारे दिसून येतात.
- रुबेलाचा परिणाम गर्भपात होणे, अकाली प्रसुती होणे आणि मृतबालक जन्माला येणे असाही होऊ शकतो.

## लक्षात ठेवा :

- ९ महिने ते १५ वर्ष वयोगटातील तुमच्या बालकाचे लसीकरण करण्यात यावे.
- जरी तुमच्या बालकाला एमआर/एमएमआरची अथवा अन्य कोणत्याही रोगाची लस यापूर्वी टोचण्यात आली असली तरी त्याला ही लस टोचून घेण्यात यावी
- रुबेला तसेच गोवरशी संबंधित न्युमोनिया, अतिसार आणि मेंदूज्वर यासारख्या प्राणघातक परिणामांपासून बालकाचे रक्षण व्हावे यासाठी लसीकरण हा एकमेव संरक्षक उपाय आहे.
- सत्राच्या ठिकाणी आणि सर्व सरकारी आरोग्य केंद्रांमध्ये एमआरची लस विनामूल्य टोचण्यात येते.
- लसीकरणासाठी बालकाला घेऊन जाताना त्याचे लसीकरण कार्ड/ माता-बाल संगोपन कार्ड नेण्यास विसरू नका.
- अधिक माहितीसाठी तुमच्या आरोग्य सेविका/आशा/अंगणवाडी सेविकेशी संपर्क साधा.

unicef for every child

World Health Organization

सुजाण आणि कर्तव्यदक्ष व्हा!
आपल्या बालकाचे संपूर्ण लसीकरण करून घ्या!